संत तुकाराम महाराजांची पालखी उद्योगनगरीत

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामाच्या अखंड जयघोषात संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा शनिवारी सायंकाळी उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरात दाखल झाला. 'ज्ञानोबा माउली तुकाराम'च्या गजराने अवघी उद्योगनगरी दुमदुमून गेली होती. निगडीतील भक्ती-शक्ती चौकात भाविकांचा अभूतपूर्व असा उत्साह दिसून आला.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने शुक्रवारी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर पालखीचा पहिला मुक्काम देहूतीलच इनामदार वाड्यात झाला. शनिवारी सकाळी शासकीय पूजा करण्यात आली. त्यानंतर पालखी पिंपरी-चिंचवड शहराच्या दिशेने मार्गस्थ झाली. अनगडशाह बाबा यांच्या दर्ग्याजवळ आणि चिंचोली पादुका येथे अभंग, आरती झाली. 'ज्ञानोबा माउली तुकाराम'च्या गजरात लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत सायंकाळी सहाच्या सुमारास पालखी पिंपरी-चिंचवड शहरात दाखल झाली.

पालखी सोहळ्यामुळे सर्व परिसर भक्तिमय झाल्याचे पाहायला मिळाले. शहरातील अनेक भाविक संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा अनुभवण्यासाठी, तसेच दर्शनासाठी आले होते. सर्व रस्ते वारकरी-भाविकांच्या गर्दीने फुलून गेले होते. आकुर्डीतील विठ्ठल मंदिरात शनिवारी पालखी मुक्कामी आहे. रविवारी पहाटे पालखी पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून पालखीचे स्वागत करण्यात आले. पालिकेच्या वतीने दिंडीप्रमुखांना देशी झाडांच्या बिया, वैद्यकीय प्रथमोपचार पेटी, कापडी पिशव्या आणि संपर्क माहितीपुस्तिकेचे वाटप करण्यात आले. पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार केला. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहायक आयुक्त यशवंत डांगे, डॉ. शिवाजी ढगे या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांकडून पालखीचे सारथ्य

श्री संत तुकाराम महाराजांची पालखी आकुर्डीत मुक्कामासाठी दाखल झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि पालखी रथाचे सारथ्य केले.

अलंकापुरी भक्तिरसात न्हाली!

ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालखी प्रस्थान सोहळ्याला उपस्थिती लावली. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पूजा पार पडली. पूजेनंतर शिंदे यांनी केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ, खासदार बारणे यांच्यासोबत फुगडी खेळण्याचा आनंद लुटला.

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : भक्तिरसात न्हाऊन निघालेली अलंकापुरी, इंद्रायणीच्या दोन्ही तटांवर जमलेला वैष्णवांचा मेळा, खांद्यावर उंचावणाऱ्या भगव्या पताका, वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील ओसंडून वाहणारा आनंद, ज्ञानोबा माउलीचा अखंड जयघोष, टाळ-मृदंगांचा टिपेला पोहोचलेला गजर अशा भक्तिमय वातावरणात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीने शनिवारी देऊळवाड्यातून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान ठेवले. पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकऱ्यांच्या मुखातून येणाऱ्या माउली नामाच्या अखंड जयघोषाने अलंकापुरी भक्तिमय झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या सोहळ्यासाठी उपस्थित होते.

आषाढी पायीवारी सोहळ्यासाठी हजारो भाविकांचा महामेळा अलंकापुरीत जमला आहे. इंद्रायणी घाट, सिद्धबेट, हैबतबाबा पायरी, पुंडलिक मंदिर, नृसिंह सरस्वती महाराज मंदिर, संत जलाराम मंदिर परिसर वारकऱ्यांनी दुमदुमून गेला आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार डॉ. अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, देवस्थानाचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, पालखी सोहळाप्रमुख योगी निरंजननाथ, डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर, देवस्थानचे व्यवस्थापक माउली वीर उपस्थित होते.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या १९३ व्या आषाढी पायीवारी प्रस्थान सोहळ्यास पहाटे चारला घंटानादाने सुरुवात झाली. काकडा, अभिषेक, महापूजा, पंचामृतपूजा, दुधारती करण्यात आली. दुपारी प्रस्थान सोहळ्याची तयारी सुरू झाली. माउलींच्या समाधीवर मुखवटा ठेवून तुळशीहार व गुलाबपुष्पांचा हार घालण्यात आला. दुपारी दोनच्या सुमारास रथापुढे व रथामागे असणाऱ्या मानाच्या दिंड्यांना महाद्वारातून मंदिरात प्रवेश देण्यास सुरुवात करण्यात आली. सर्व दिंड्या मंदिराला प्रदक्षिणा घालून पुढे पुढे सरकत होत्या.

वीणा-टाळ-मृदंगाच्या गजराने माउली तुकारामांच्या जयघोषाने मंदिर व आजूबाजूचा परिसर भक्तिमय झाला होता. दुपारी चारच्या सुमारास पालखी प्रस्थानाच्या मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली. श्रीगुरू हैबतबाबा यांच्या तर्फे श्रींची आरती झाली. त्यानंतर माउली संस्थानातर्फे श्रींची आरती झाली. वैभवी चांदीच्या पादुका प्रस्थानासाठी पुष्पसजावटीने सजलेल्या चौथऱ्यावर वीणा मंडपात ठेवण्यात आल्या. चलपादुकांची विधिवत प्राणप्रतिष्ठा झाली. सर्वांच्या मुखी 'ज्ञानोबा तुकाराम', 'माउली माउली', 'ज्ञानोबा माउली तुकाराम' असा गजर सुरू होता. उत्तरोत्तर सोहळ्याची रंगत वाढतच गेली. सोहळा सुरू असताना दिंड्यांमधील भगवे ध्वज डौलाने फडकत होते. त्यानंतर माउलींचे मानाचे दोन अश्व मंदिरात आणण्यात आले. अश्वांनी मंदिराला प्रदक्षिणा घातली. अश्व महाद्वारातून बाहेर पडताच मंदिरातील दिंड्या मंदिराबाहेर सोडण्यास सुरुवात करण्यात आली.

दरम्यान, पालखी मंदिरातून बाहेर निघताच उपस्थित वारकरी, भक्तांनी एकच जल्लोष सुरू केला. पालखी खांद्यावर घेण्यासाठी वारकरी, भाविकांची झुंबड उडाली होती. या उत्साही वातावरणातच पालखीची मंदिराला प्रदक्षिणा झाली आणि पालखी मुक्कामासाठी आजोळी गांधीवाड्यात दाखल झाली. प्रस्थान सोहळा 'याचि देही याचि डोळा' अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत.

दूध भुकटी आयातीच्या निर्णयाने दूध संघ धास्तावले

देशभरात अडीच लाख टन साठा शिल्लक असताना आयातीचा निर्णय; दूध संघांच्या विरोधासाठी हालचाली

दयानंद लिपारे, लोकसत्ता

कोल्हापूर : देशभरात सुमारे अडीच लाख टन दूध भुकटीचा साठा शिल्लक आहे. अशातच केंद्र शासनाने १० हजार टन दूध भुकटी आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. आधीच आर्थिक नुकसान सोसत असलेल्या दूध संघांना यामुळे आणखी आर्थिक फटका बसण्याची चिन्हे आहेत. यामुळे केंद्र शासनाने आपला निर्णय मागे घ्यावा, यासाठी दूध संघांकडून आता हालचाली सुरू झाल्या आहेत.

देशात करोना टाळेबंदी काळात दुधाच्या मागणीमध्ये घट झाली होती. यामुळे दुग्ध व्यवसाय अडचणीत आला होता. त्यानंतर गेली दोन वर्षे दूध आणि दुग्ध उत्पादन पदार्थांना मागणी वाढली होती. गेल्या वर्षभरात दुधाचे उत्पादन वाढले आहे. त्या तुलनेने मागणी घटली आहे. दुग्धोत्पादन, मिठाई, आईस्क्रीम आदींची पूर्वीइतकी मागणी राहिलेली नाही. दुधाची मागणी कमी आणि पुरवठा अधिक झाल्यामुळे दुधाचे दर घसरले आहेत.

सध्या राज्यात प्रति लिटर २७ रुपये दराने दूध खरेदी केले जाते. काही भागांमध्ये ते २५ रुपयांनी खरेदी केले जाते. दूध संघ बळकट असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ, वारणा यांसारखे दूध संघ प्रति लिटर ३३ रुपये दर देत आहेत. दूध हा नाशवंत घटक आहे. दुधाची मागणी घटल्याने गेल्या वर्षभरापासून दूध संघांना शिल्लक राहणाऱ्या दुधाची भुकटी करणे भाग पडले. भुकटीचा हा साठा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्याला देशांतर्गत मागणी नसल्याने हा साठा आता देशभरात अडीच लाख टन इतका झाला आहे.

> सध्या 'ग्लोबल डेअरी ट्रेंड' मध्ये भुकटीला प्रतिकिलो २२५ रुपये दर मिळत आहे. राज्यातील दूध संघांना ५० रुपये अनुदान मिळाले, तरी किमान २५० रुपये दर मिळू शकेल. आखाती, आफ्रिकी देशांमध्ये दूध भुकटी निर्यात करणे शक्य होणार आहे. भुकटी उत्पादनाचा एकूण खर्च २७५ रुपये असला, तरी संघ किमान २५ रुपये नुकसान सोसतील. पण त्यामुळे भुकटी साठवून ठेवण्यावर होणारा खर्च कमी होत संघांचे आर्थिक नुकसान कमी होईल.
> – योगेश गोडबोले, कार्यकारी संचालक, गोकुळ

> केंद्र सरकारने दूध भुकटी आयात करण्याचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा राज्य सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना ५ रुपयांचे दिलेले अनुदानदेखील उपयोगी ठरणार नाही. राज्य सरकारने केंद्र सरकारवर दबाव आणून सदर निर्णय मागे घेण्यास भाग पाडावे.
> – राजू शेट्टी, स्वाभिमानी दूध संघ

पुण्यात अल्पवयीन मुलाकडून आणखी एक अपघात

पाण्याच्या टँकरच्या धडकेत महिला प्रशिक्षकासह कुस्तीपटू जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : कल्याणीनगर अपघात प्रकरण ताजे असताना एका १५ वर्षीय मुलाकडून अपघाताची आणखी एक घटना कोंढवा भागात घडली. पाण्याच्या टँकरने दिलेल्या धडकेत कुस्ती प्रशिक्षक महिला आणि प्रशिक्षणार्थी कुस्तीपटू युवती जखमी झाली. कोंढव्यातील एनआयबीएम रस्त्यावर शनिवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी टँकरचालक अल्पवयीन मुलाच्या वडिलांसह मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

अपघातात कुस्ती प्रशिक्षक गीता संतोष ढुमे (वय ४१, रा. स्काय हाईट्स, पिसोळी) आणि कुस्तीपटू सोनी चंद्रसिंग राठोड (वय २०) जखमी झाल्या आहेत. याप्रकरणी १५ वर्षीय टँकरचालक मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत संतोष तुकाराम ढुमे (वय ४६, रा. सद्गुरू कृपा, पोकळे वस्ती, कोंढवा) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. टँकरचालक मुलगा कोंढवा येथील बोराडेनगर परिसरात राहायला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ढुमे महापालिकेत चालक आहेत. ढुमे, त्यांची पत्नी आणि मुलगी येवलेवाडीतील महाकाल कुस्ती संकुलात नियमित व्यायामासाठी जातात. त्यांची पत्नी गीता कुस्तीपटू असून, त्या सध्या प्रशिक्षण देतात. नेहमीप्रमाणे ढुमे दाम्पत्य सकाळी सहाच्या सुमारास एनआयबीएम रस्त्यावर स्काय हाईट्स सोसायटीमध्ये असलेल्या वसतिगृहात गेले. वसतिगृहातील २५ युवतींना घेऊन ते कुस्ती संकुलात निघाले होते. युवती धावण्याचा सराव करत होत्या.

एनआयबीएम रस्त्यावर एव्हरजॉय सोसायटीसमोरून दुचाकीस्वार ढुमे आणि त्यांची पत्नी निघाले होते. त्यावेळी कुस्तीपटू सोनी राठोड पाठीमागे राहिलेल्या युवतींना धावण्याची सूचना देत होती. त्यावेळी भरधाव टँकर पाठीमागून आला. टँकरने सोनी राठोडला धडक दिली, तसेच दुचाकीस्वार ढुमे दाम्पत्याला धडक दिली. सहप्रवासी गीता ढुमे टँकरच्या धडकेत रस्त्यावर पडल्या. सोनी राठोड टँकर चाकाखाली सापडली. दुचाकीस्वार ढुमे यांनी तातडीने नागरिकांच्या मदतीने टँकरच्या चाकाखाली सापडलेल्या सोनीला बाहेर काढली. सोनी आणि गीता गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. नागरिकांनी टँकरचालक मुलाला ताब्यात घेऊन त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

मुलांना वाहन चालविण्यास दिल्यास गुन्हा

अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास दिल्यास वाहनमालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला होता. कल्याणीनगर अपघात प्रकरणात मुलाला महागडी मोटार चालविण्यास दिल्याप्रकरणी मुलाचे बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. शहरात सर्रास अल्पवयीन मुले वाहन चालविताना दिसतात. अतिवेग आणि पालकांच्या बेफिकिरीमुळे गंभीर अपघात घडतात.

टँकरचालक मुलाच्या वडिलांसह मालक अटकेत

कोंढवा पोलिसांनी याप्रकरणात दोन गुन्हे दाखल केले आहेत. टँकरचालक आरोपी अल्पवयीन मुलावर पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे. त्याचे वडील शब्बीर पठाण आणि टँकरमालक महेंद्र बोराटे यांच्याविरुद्ध अल्पवयीन मुलाला टँकरसारखे अवजड वाहन चालवण्यास दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पठाण आणि बोराटे यांना अटक करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक किसन राठोड तपास करत आहेत.

बारामतीतील गोळीबारात जखमी झालेल्या रणजित निंबाळकरांचा उपचारांदरम्यान मृत्यू

पुणे : बारामतीत शर्यतीचा बैल खरेदी करण्याच्या व्यवहारातून गोळीबारात गंभीर जखमी झालेले रणजित निंबाळकर यांचा पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचारांदरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी सोमेश्वर साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष शहाजी काकडे आणि त्यांचा मुलगा गौरव यांना अटक करण्यात आली.

याप्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात सोमेश्वर कारखान्याचे माजी अध्यक्ष शहाजी काकडे, त्यांचा मुलगा गौरव, गौतम शहाजी काकडे (तिघे रा. निंबुत, ता. बारामती, जि. पुणे) यांच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी गौरव काकडे आणि त्याचे वडील शहाजी यांना अटक करण्यात आली. रणजित निंबाळकर यांच्यावर गोळीबार करण्यासाठी वापरलेले पिस्तूल शहाजी काकडे यांचे असून, काकडे यांच्याकडे शस्त्र परवाना आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

ज्ञानदेवा भेटी नामदेव आले

पंढरीचा भक्तिरंग

संत ज्ञानदेव आणि संत नामदेव यांची भेट ही एक ऐतिहासिक घटना. ज्ञानेश्वरी हा प्रमाणग्रंथ देऊन ज्ञानदेवांनी समता, बंधुता सांगणाऱ्या वारकरी संप्रदायाचा पाया घातला, तर आसेतुहिमाचल फिरून नामदेवांनी या विचारांचा विस्तार केला. अशा या क्रांतिकारी घटनेला उजाळा देणारे ज्ञानदेव-नामदेव भेटीचे भव्य शिल्प आळंदीच्या सीमेवर उभे राहिले आहे. आज माउलींची पालखी तेथे पहिला विसावा घेईल.

डॉ. श्रीरंग गायकवाड

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत नामदेव महाराज यांच्या नेतृत्वात १३ व्या शतकात समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारी वारकरी चळवळ उभी राहिली. अशा या समाज जोडणाऱ्या दोन महान संतांची पहिली भेट म्हणजे ऐतिहासिकच घटना. तिला उजाळा देण्यासाठी आळंदीच्या सीमेवरील वडमुखवाडी येथील थोरल्या पादुका या ठिकाणी समूहशिल्प उभे राहिले आहे. याच ठिकाणी आषाढी वारीला निघालेला माउलींचा पालखी सोहळा पहिल्या विसाव्यासाठी थांबतो. पुणे-आळंदी रस्त्यावरील हे ज्ञानदेव-नामदेव भेटीचे शिल्प पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने उभारले जात आहे. एकमेकांना आलिंगनासाठी सामोरे जाणाऱ्या या संतांसोबत संत निवृत्तीनाथ, संत सोपान, संत मुक्ताई यांचे आणि इतर संत, वारकऱ्यांचे पुतळे आहेत. शिल्पकार महेंद्र थोपटे यांनी हे अप्रतिम पुतळे साकारले आहेत. पंढरपुरातील संत नामदेवांच्या वंशजांकडे ज्ञानदेव-नामदेव भेटीचे एक जुने चित्र आहे. त्याचाही आधार या शिल्पासाठी घेण्यात आला आहे.

महत्त्वाचे म्हणजे या पुतळ्यांच्या खाली संतांच्या जीवनातील अनेक प्रसंग साकारले जात आहेत. यातील एक महत्त्वाची चित्र-शिल्प संकल्पना आहे, ज्ञानेश्वरीतील १८ अध्यायांची ! संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी ज्ञानेश्वरीतील प्रत्येक अध्यायाचे सार सांगणारी ही चित्रमालिका सुचविली आहे. या चित्रांसाठी वैकुंठवासी प्राचार्य मामासाहेब दांडेकर यांच्या जुन्या ज्ञानेश्वरीतील चित्रांचा आधार घेण्यात आला आहे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरीतील दुसऱ्या अध्यायामध्ये रणांगणात आपल्याच आप्तस्वकीयांशी कसे लढावे, या विचाराने हतबुद्ध झालेला अर्जुन भगवान श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करत आहे. त्या प्रसंगाचे वर्णन माउली असे करतात,

तयापरी तो धनुर्धरु । जाहलासे दुःखें जर्जरु ।
जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु । वणवला कां ॥
म्हणोनि सहजें सुनीळु । कृपामृतें सजळु ।
तो वोळलासे श्रीगोपाळु । महामेघु ॥

म्हणजे, ज्याप्रमाणे उन्हाळ्यात एखादा मोठा पर्वत वणव्याने व्यापावा, त्याप्रमाणे अर्जुन दुःखाने जर्जर झाला होता. म्हणून स्वभावतः सुनीळ अर्थात सावळा आणि कृपामृतरूप जलाने युक्त असा श्रीकृष्णरूपी महामेघ कृपावर्षावासाठी अर्जुनाकडे वळला. या वर्णनाबरहुकूम वणव्यात उभा असलेला अर्जुन घननीळ श्रीकृष्णाकडे प्रार्थना करतो आहे, असे म्युरल तयार करण्यात आले आहे. याच पद्धतीने ज्ञानेश्वरांनी प्रत्येक अध्यायात जे दृष्टान्त सांगितले, ते या चित्रांमधून साकारण्यात आले आहेत. ही संपूर्ण चित्रमालिका पाहिली, तरी कोणालाही ज्ञानेश्वरीतील विचारांचे सार सहज लक्षात येईल.

याशिवाय संत ज्ञानदेव, संत नामदेवांच्या आणि इतर संतांच्या चरित्रातील, साहित्यातील चित्रेही इथे पाहायला मिळतात. उदाहरणार्थ, संत जनाबाईंच्या अभंगातील लेकुरवाळा विठुराया, तहानेने तडफडणाऱ्या गाढवाला गंगाजल पाजणारे संत एकनाथ महाराज, भारुडातून 'बया दार उघड' असे रुक्मिणीमातेला आवाहन करणारे नाथबाबा, छत्रपती शिवराय आणि संत तुकाराम महाराज यांची भेट आदी अनेक सुबक चित्रे या ठिकाणी पाहायला मिळतील. ही सर्व चित्रे आळंदीला येणाऱ्या-जाणाऱ्या वारकऱ्यांच्या टाळमृदंगाच्या गजरात आणि संतांच्या जयघोषात, घरात वारकरी परंपरा असलेले योगेश कुंभार यांनी साकारली आहेत.

याबाबत प्रकल्पाच्या संकल्पनेबाबत डॉ. सदानंद मोरे म्हणाले, 'संत ज्ञानेश्वर महाराज त्या काळातील केवळ संतच नव्हे, तर सर्वश्रेष्ठ योगी होते. नाथ संप्रदाय त्यांनी वारकरी संप्रदायाकडे वळवला. वारकरी संप्रदायाचे पाईक असणारे संत नामदेव आणि त्यांच्यातील सुसंवादातून वारकरी संप्रदाय आकारास आला. हा समन्वय यातील महत्त्वाचा भाग आहे.'

माउलींच्या माध्यमातून नाथ पंथ, एकनाथ महाराजांच्या माध्यमातून दत्त संप्रदाय आणि तुकाराम महाराजांच्या माध्यमातून चैतन्य संप्रदाय वारकरी संप्रदायात प्रवाहित झाले. सर्व विचारधारांचा आदर करून त्यांचा समन्वय वारकरी संप्रदायाने घडविला. त्याच समन्वय विचारांचे प्रतीक असणाऱ्या या समूहशिल्पापुढे प्रत्येक वारकरी नतमस्तक होऊनच पुढे जाईल आणि संतांचा विचार निरंतर जागता राहील.

dnyanabatukaram@gmail.com